मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## दिव्यांग कल्याण विभाग

३१,३२,३५, तिसरा मजला मित्तल टॉवर,
ए- विंग, बॅरीस्टर रंजनी पटेल मार्ग,
नरिमन पॉईट, मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-४०१४५१४५
Email : sec.dkv@maharashtra.gov.in

---

क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६८/दि.क.२. दिनांक:- १२ मे, २०२३

प्रति,
सर्व अ.मु.स. / प्र.स. / सचिव.
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय:- शासकीय/निमशासकीय कार्यालयातील दिव्यांग कर्मचारी/अधिकारी भरती, पदोन्नती व आरक्षणाबाबत.**

संदर्भ :-१.सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.अपंग-२००४/प्र.क्र.१८/०४/१६-अ, दि.१५ डिसेबर, २००४.
२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २९ मे, २०१९.
३.वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ. पु क्र., दि. ३१ ऑक्टोबर, २०२२.
४.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि. २० एप्रिल, २०२३.

महोदय/ महोदया,

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने व राज्य शासनाने वेळोवेळी घेतलेल्या उपरोक्त शासन निर्णयांच्या अनुषंगाने असे कळविण्यात येत आहे की, शासनाने पदभरतीमध्ये व पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षण लागू केले असून त्याची अंमलबजावणी करण्याकरीता निर्देश निर्गमित केले आहेत.

२. शासनाने आता पदभरतीवरील निर्बंध शिथिल केले असून त्या अनुषंगाने संदर्भ क्र.३. येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. यामुळे आता सर्व विभागाच्या बहुतांश प्रवर्गातील भरती प्रक्रिया सूरु झाली असून त्यात दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्याशिवाय उपरोक्त संदर्भ क्र.२. व संदर्भ क्र.४ प्रमाणे पदोन्नती मध्ये ही ४ टक्के आरक्षण देण्याबाबत निर्णय झाला असल्याने पुढील पदोन्नत्यांमध्ये सुध्दा त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

३.	तसेच उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या अनुषंगाने शासनाने दिव्यांगांना बदली देताना कोणकोणत्या बाबींनुसार त्यांना बदली देण्यात यावी याबाबत सुध्दा निर्देश दिले असून दिव्यांगाना मुख्य प्रवाहात आणण्याकरीता बदल्या करतांना कशाप्रकारे नियुक्ती द्यावी, याबाबत निर्देश निर्गमीत केले आहेत.

४.	तथापि, संदर्भांकित शासन निर्णयांतील तरतूदीनुसार अनेक मंत्रालयीन विभाग तसेच अधिनस्त शासकीय कार्यालयांमध्ये कार्यवाही होत नसल्याचे आढळून आले आहे. तरी आपणांस अशी विनंती करण्यात येते की, आपण आपल्या विभागात व विभागाच्या अधिनस्त कार्यालयांतून होणाऱ्या अथवा प्रस्तावित बदल्या / नियुक्त्या / पदोन्नत्यांमध्ये अनूपालन करण्यास संबंधितांस निर्देशित करावे.

आपला,

१२.५.2023.

(अभय महाजन)
सचिव.

सोबत :- सहपत्रे.

प्रत,
दिव्यांग कल्याण निवडनस्ती /दि.क.२.

**शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्याची बदली त्याच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : अपंग-१००४/प्र.क्र.१८/०४/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५.१२.२००४.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०८५/१४७/सीआर-७४/१६-अ, दि.७.१०.१९८७.
२) सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक : अपंग-१००४/प्र.क्र.१८/०४/१६-अ, दि.१५.४.२००४.

**शासन परिपत्रक :-**

शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेऊन त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत संदर्भाधीन क्र.१ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि या सूचनांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही असे निदर्शनास आल्यामुळे संदर्भाधीन क्र.२ च्या परिपत्रकान्वये, मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना पुन्हा सूचना देण्यात आल्या होत्या की, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी शासनाने दि.१६ जानेवारी २००४ रोजी प्रख्यापित केलेल्या अध्यादेशास अधीन राहून शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रशासकीय सोयीनुसार शक्य असल्यास त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ कराव्यात.

आता या अनुषंगाने सुधारित सुचना देण्यात येत आहेत की, शासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांच्या बदल्या, शासनाने दि.१६.१.२००४ रोजी तसेच दिनांक २ जुलै २००४ रोजी प्रख्यापित केलेले अध्यादेश / बदल्यांचे नियम, यातील तरतुदींस बाधा येणार नाही या अटीचे अधीन राहून त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळील कार्यालयात पदांची उपलब्धता आणि प्रशासकीय सोय लक्षात घेवून करता येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( दे.प्रे.कुमावत )
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१.राज्यपाल यांचे सचिव,
२.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४.सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५.मुख्य सचिव,
६.शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
७.*प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
८.*प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
९.*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१०.*प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
११.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१३*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४.सर्व विभागीय आयुक्त,
१५.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
१६.सर्व जिल्हाधिकारी,
१७.सर्व महापालिकांचे आयुक्त,
१८.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९.सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
२०.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई,
२१.अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२२. आयुक्त, अपंग कल्याण, ३, चर्च रोड, पुणे,
२३.सर्व मंत्रालयीन विभाग,
२४.मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
२५.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६.निवड नस्ती.

---

रोटा/एच–789(4500–12–2004).

**दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित करणे व आरक्षण अमंलबजावणीची कार्यपध्दती......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड
दिनांक - २९ मे, २०१९

**वाचा** :- (१) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे,१९७८

(२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०८१/प्र.क्र.१५/९९/१६-अ, दिनांक ७ सप्टेंबर, १९८२

(३) शासन निर्णय समाजकल्याण, संसकृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इडीडी १०९० २२५९२/सिआर ४००/सुधार-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९२

(४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९७/सीआर-२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, १९९७

(५) शासन परिपक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ दिनांक ०२ मे, १९९८

(६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/प्र.क्र.१०३८(भाग ३)/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७

(७) दिव्यांगांचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर, २०१६

(८) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची दिनांक १५ जून, २०१७ ची अधिसूचना

(९) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६०३५/०२/२०१७ (आस्था), दिनांक १५ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ३३ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी गट अ ते ड मधील पदावर नियुक्तीसाठी ३% आरक्षण दिनांक २ मे, १९९८ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक २०.११.१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंगासाठी गट क व ड च्या सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीसाठी ३% आरक्षण लागू करण्यात आले होते. केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असून अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५.६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेले आहे. केंद्र शासनाने दिनांक १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह

एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४ % आरक्षण विहित केलेले आहे.

मंत्रिमंडळाने दिव्यांग व्यक्तींसाठींच्या महाराष्ट्र राज्य धोरणास मान्यता दिली असून त्यामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अनुसार दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या सेवेतील आरक्षणाचा समावेश आहे. त्यानुसार शासन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः-

१. दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २ (r) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, दिव्यांग व्यक्तींसाठी शासन सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमूद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% तसेच गट ड व इ साठी १% या प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध /अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायु विकृती (muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर

२. **पदांची गणना :-** गट क व गट ड मधील पदांची गणना करतांना, त्या भरती वर्षातील त्या त्या गटातील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या संख्येवर निश्चित करावी. असे करतांना त्या त्या गटातील दिव्यांगासाठी एकाच आस्थापनेतील सुनिश्चित करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे व सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत. परंतु जेव्हा सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील पदांची संख्या मोठी राहील अशा वेळी ज्या संवर्गाची पद संख्या व रिक्त पदे कमी आहेत असा संवर्ग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावा. गट क संवर्गातील तीन विविध पदनाम असलेल्या पदावर पदभरती करावयाची असल्यास त्यातील एक पद अपंगासाठी सुनिश्चित नसल्यास उक्त पदातील रिक्त पदावरील

आरक्षणाची ४% पदे अन्य दोन संवर्गात घेण्यात यावीत.उदाहरणार्थ लिपिक, वरिष्ठ लिपिक व वनपाल अशी तीन पदावर पद भरती करतांना वनपाल पद सुनिश्चित नसल्यास, वनपाल या संवर्गाची रिक्त पदाची संख्या अन्य दोन संवर्गापेक्षा मोठी असल्यास उर्वरित दोन संवर्गातील ज्या पदाची रिक्त पदाची संख्या कमी असेल त्या संवर्गाची पदे दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात यावी. असे करत असताना विहित आरक्षणाचे प्रमाण ओलांडले जाईल. भरतीसाठी ७ रिक्त पदे उपलब्ध होत असल्यास त्यातील १ पद दिव्यांगासाठी आरक्षित करावे. ७ पेक्षा जास्त पदे भरतीसाठी उपलब्ध होत असल्यास विहित आरक्षणाप्रमाणे पद गणना करावी.

विहित दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी गट “अ” व “ब” च्या सरळसेवेच्या कोट्यातील पदासाठी आरक्षणाची पदे निश्चित करतांना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात रिक्त पदावर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच (सरळ सेवेच्या कोट्यातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

३. **पद सुनिश्चितीकरणास अपवाद :-** उपरोक्त तरतुदीनुसार एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या शासकीय विभागास वा आस्थापनेस अथवा संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुनिश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह व अपंग आयुक्त यांच्या शिफारशींसह संबंधीत प्रशासकीय विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करावेत. तसेच यापूर्वी अपवाद करण्यात आलेल्या संवर्गासाठी / पदांसाठी पुन:श्च मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

४. **अनारक्षित पदावर दिव्यांग व्यक्तींची नियुक्ती :-** दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरविता येणार नाही. जर दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

५. **दिव्यांगाचे प्रमाणपत्र** - दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त

प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहतील. दिव्यांगाचे प्रमाणपत्र बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६. **वयोमर्यादा :-** दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवा प्रवेशासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ जून २००१ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा कायम ठेवण्यात येत असून ती वय वर्षे ४५ इतकीच राहील.

७. **बिंदूनामावली (रोस्टर) राखणे :-** प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील प्रत्येक संवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती सरळ सेवा भरतीच्या पदासाठी १०० बिंदू नामावलीची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यापूर्वी ३ % आरक्षणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीसाठी बिंदू नामावलीतील बिंदू क्रमांक १, ३४ व ६७ निश्चित करण्यात आले होते. परंतु आता दिव्यांगाच्या ४ वर्गवारी असल्याने व बिंदूनामावली राखण्यास सुसूत्रता यावी म्हणून बिंदू क्रमांक १, २६, ५१ व ७६ बिंदू निश्चित करण्यात येत आहेत.

वरील बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.

| | |
|---|---|
| गट १ बिंदू क्रमांक | १ ते २५ |
| गट २ बिंदू क्रमांक | २६ ते ५० |
| गट ३ बिंदू क्रमांक | ५१ ते ७५ |
| गट ४ बिंदू क्रमांक | ७६ ते १०० |

बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असून, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदू निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा. एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरुवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

जरी बिंदू क्रमांक १,२६,५१,७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांनी घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव उमेदवाराचा

समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदूंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना "प्रपत्र अ" सोबत देण्यात आला आहे.

**८. दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे** :-

(१) एखादया भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा. ती जागा इतर कोणत्याही उमेदवारांमधून भरण्यात येऊ नये. जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी. अंतर्गत परिवर्तनातून पद भरती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समजावे. अंतर्गत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे. वरीलप्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणण्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करण्यात येईल व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगांसाठी विहित आरक्षणानुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवावे. असे करताना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

९. **दिव्यांग व्यक्तींचा समावेश** :- दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. जसे अनुसूचित जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहित केलेल्या बिंदूवर समाविष्ठ करावे तसेच अनुसूचित जमातीचा उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदूवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदूवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदूवर दर्शविण्यात यावा. परंतू जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदूवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदूवर त्याचा समावेश करण्यात येवू नये.

१०. **पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सुट देणे** :- दिव्यांगासाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात

आलेल्या अटी व शर्तीमध्ये सुट देऊन करता येईल. परंतु असे करताना विहित अपंगत्वाच्या प्रमाणात कोणतीही सुट देता येणार नाही. सुट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

**११. मागणीपत्र सादर करतांना निवड प्राधिकरणास सादर करावयाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या "प्रपत्र ब" मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत करावे. तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवार दिव्यांगासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीत अपंगत्व असल्याची खात्री करून आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असल्याचीही खातरजमा करील.

१२. केंद्र शासनाने दि. १५.०१.२०१८ च्या कार्यालयीन आदेशात दिव्यांगांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ठेवलेली नाही. परंतु दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मध्ये संबंधित राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करत आले आहे. केंद्र शासनाने सन १९९८ मध्ये दिव्यांगांना गट क व ड च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण दिले होते. राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी दिनांक ५/०३/२००२ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तेव्हा गट क व ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उक्त तरतूद जशीच्या तशी सुरू राहतील. गट अ व ब च्या पदावरील पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या निर्णयानंतर यथावकाश घेण्यात येईल.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महारष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१४४२२८४९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.29 14:59:30 +05'30'

(टि.वा.करपते)

उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२

२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई- ३२
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुबई-३२
१९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र अ**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पद भरतीची माहिती ठेवण्यासाठी

बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेशन क्रमांक | बिंदू क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहित दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे काय | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क, (ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

## प्रपत्र - ब

## मागणीपत्रासोबत सादर करण्याचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक --- वरील चक्री क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील ----- इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे.

सक्षम नियुक्ती प्राधिकारी

पदभरतीवरील निर्बंध शिथील करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक- पदनि-२०२२/प्र.क्र.२ /२०२२/आ.पु.क.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ ऑक्टोबर, २०२२

वाचा :-

शासन निर्णय, क्रमांक-पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क. दि.३०.०९.२०२२

प्रस्तावना :-

राज्य शासनाच्या विविध विभाग / कार्यालयांतील पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध अंतिम निश्चित करण्याच्या सूचना वित्त विभागाच्या दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सुधारित आकृतीबंध अंतिम करताना, वित्त विभागातील विविध कार्यासनांकडून प्रस्तावांची छाननी करण्यात येते. त्यानंतर, सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या दि.०९.०६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उप समितीपुढे छाननी व शिफारशीसाठी सादर करण्यात येतात. उप समितीच्या शिफारशीसह सदर प्रस्ताव मान्यतेसाठी वित्त विभागाच्या दि.१०.०९.२००१ च्या शासन निर्णयान्वये गठित उच्च स्तरीय सचिव समितीपुढे सादर करण्यात येतात. त्यापैकी काही प्रस्ताव आवश्यकतेनुसार मंत्रिमंडळापुढे सादर करावे लागतात. सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यासंबंधीच्या प्रक्रियेतील वरिल टप्पे विचारात घेता, त्यास बराच कालावधी लागतो.

वित्त विभागाच्या ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सुधारित आकृतीबंध अंतिम निश्चित झालेल्या विभाग / कार्यालयांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील रिक्त पदे १०० टक्के भरण्यास मुभा देण्यात आली असून अन्य संवर्गातील रिक्त पदांच्या ५० टक्के पदे भरण्याची मुभा आहे. ज्या विभाग / कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला नाही, अशा विभाग / कार्यालयांना पदे भरण्यास उपसमितीची मान्यता आवश्यक असते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात अंदाजे ७५ हजार सरळसेवा कोट्यातील पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे. सदर पदे भरण्याचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य व्हावे यासाठी, केवळ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरती करीता, ज्या प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम मंजुर केलेले नाहीत, अशा विभाग/ कार्यालयांतील पदे देखील भरतीसाठी उपलब्ध होण्याकरीता, वित्त विभागाच्या दि.३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेले पदभरतीबाबतचे निर्बंध शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

वरील संदर्भाधीन दि.३०.०९.२०२२ च्या शासन निर्णयामधील पदभरतीवरील निर्बंधांमध्ये शिथिलता देऊन खालीलप्रमाणे पदभरतीस मान्यता देण्यात येत आहे.

(अ) ज्या विभागांचा/कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अंतिम झालेला आहे,अशा विभाग / कार्यालयांतील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यास मुभा देण्यात येत आहे.

(ब) ज्या विभाग / कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही, अशा विभाग / कार्यालयांतील गट-अ , गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट - ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात येत आहे.

(क) वरील (अ) व (ब) प्रमाणे शिथीलता केवळ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरतीसाठी दि.१५ ऑगस्ट,२०२३ पर्यंत लागू राहील. त्यापुढील भरती प्रक्रिया वित्त विभाग शासन निर्णय दि.३० सप्टेंबर, २०२२ अन्वये करण्यात येईल.

(ड) दरम्यानच्या कालावधीमध्ये, ज्या प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या दि.११.०२.२०१६ च्या शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे सुधारित आकृतीबंध अद्याप अंतिम मंजुर केलेले नाहीत, त्या प्रशासकीय विभागांनी त्यांचा व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांतील पदांचा आढावा घेऊन उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंध अंतिम मंजुर करण्याची कार्यवाही तत्परतेने पूर्ण करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२२१०३११५३९४९८५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shilpa Bhalchandra Bhogate

Digitally signed by Shilpa Bhalchandra Bhogate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Fin. Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fefbb04337cdc79220fd9bf89ce560d02ee18fb7525212105653017c283, cn=Shilpa Bhalchandra Bhogate
Date: 2022.10.31 15:43:50 +05'30'

( शि. भा. भोगटे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता,विधानपरिषद /विधानसभा, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा /विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन मुंबई-३५
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
५. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
६. मंत्रालयीन सर्व विभाग.
७. मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
८. वित्त विभागातील सर्व कार्यासने.
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१२. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१४. आयुक्त,राज्य माहिती आयोग (सर्व)
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१६. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
१७. राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.
१८. सर्व विभागीय आयुक्त.
१९. सर्व जिल्हाधिकारी.
२०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.

२१. महासंचालक, यशदा, राज भवन आवार, बाणेर रोड, पुणे.
२२. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
२३. महालेखापाल-१( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र, मुंबई.
२४. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
२५. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
२६. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
२७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२८. संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२९.सह संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३२. जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा.
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३४. सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.
३५. मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
३६. कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर.
३७. कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
३८. कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
३९. कुलसचिव, कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४०. कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
४२. कुलसचिव. पुणे विद्यापीठ, पुणे.
४३. कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४५. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
४६. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४७. कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
४८. कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
४९. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
५०. कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर.
५१. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, रायगड.
५२. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई.
५३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक क्र.१, नरिमन पॉईंट, मुंबई.
५४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४ राजभवन, मुंबई ४.
५५. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई १३.

५६. इंडियन नॅशनल कॉँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय) समिती, टिळक भवन,दादर, मुंबई २५.
५७. राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१.
५८. शिवसेना, शिवसेना भवन, दादर, मुंबई २८.
५९. निवड नस्ती, वित्त विभाग (आ.पु.क.).

दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट "ड" ते गट "अ" च्या निम्नस्तरापर्यंत (Lowest rung of group "A") मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - २० एप्रिल, २०२३

संदर्भ :
१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ५ मार्च, २००२
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८ / प्र.क्र.११४ /१६-अ, दिनांक २९ मे, २०१९
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१५/ प्र.क्र.१७१ /१६-अ, दिनांक ५ जुलै, २०२१
४) कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश क्र. ३६०१२ / १ /२०२०-Estt. (Rest.-II), दि. १७ मे, २०२२
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी ११२२/ प्र.क्र.१०० /१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२२

प्रस्तावना-

दिव्यांग अधिनियम, २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींसाठी ४ % आरक्षण संदर्भाधीन क्रमांक २, दिनांक २९.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित केले आहे. तसेच सदर आरक्षण अंमलबजावणीची कार्यपद्धती नमूद करण्यात आली आहे. त्यामध्ये गट-क व गट-ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना ४ % आरक्षणाप्रमाणे पदोन्नती देताना शासन निर्णय दिनांक ०५.०३.२००२ मधील कार्यपद्धतीचा वापर करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने राजीव कुमार गुप्ता व इतर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ५२१/२००८ प्रकरणी शासन सेवेतील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट "अ" व गट "ब" च्या पदावर पदोन्नती देण्याबाबत आरक्षण लागू करावे, असा निर्णय दिनांक ३०.०६.२०१६ रोजी दिला. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. १५६७/२०१७ (सिद्दराजू विरुध्द कर्नाटक राज्य) या प्रकरणी दि. १४.०१.२०२० रोजी अंतिम निर्णय दिला. त्यामध्ये देखील दिव्यांगांना गट-अ व गट-ब पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे उक्त न्यायनिर्णय तसेच दिव्यांगांना गट-अ व गट-ब च्या पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण देणेसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिकांवर मा. उच्च न्यायालय, मुंबई दि. २९.०६.२०२१ चे आदेश आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीमध्ये आरक्षण देणेबाबत दि.०५/०७/२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णय केंद्र शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपील क्र. १५६७/२०१७ प्रकरणी दाखल केलेला संकीर्ण अर्ज क्र. २१७१/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचनांच्या आणि मा. उच्च न्यायालयात प्रलंबित रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ६८१९/२०२१ व इतर याचिका यांमध्ये होणाऱ्या अंतिम आदेशाच्या अधीन

राहून निर्गमित करण्यात आला आहे. आता केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने संदर्भ क्रमांक ४ येथील दि.१७/०५/२०२२ रोजीचा कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगांना गट-क ते गट-अ च्या निम्न स्तरापर्यंतच्या पदांना दिव्यांगांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुषंगाने दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील, गट-क मधून गट-क मधील पदावर पदोन्नतीबाबतचा दि.५.३.२००२ रोजीचा शासन निर्णय तसेच तद्नुषंगिक अन्य सर्व आदेश अधिक्रमित करुन तसेच दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट अ व गट ब पदांवर पदोन्नतीबाबत दि.५.०७.२०२१ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन गट-ड ते गट-अ च्या निम्नस्तरापर्यंतच्या पदांना (Lowest rung of group "A") पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षणाबाबतच्या सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

१) पदांची गणना -

१.१ दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील, गट-क मधून गट-क मधील, गट-क मधून गट-ब मधील, गट-ब मधून गट-ब मधील, गट-ब मधून गट-अ मधील निम्नस्तरापर्यंतच्या (Lowest rung of group "A") नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांवर (Identified Posts) पदोन्नतीमध्ये ४ % आरक्षण देण्यात यावे.

१.२ पदोन्नतीमध्ये एखाद्या संवर्गातील रिक्त पदाच्या ४ % पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत. दिव्यांगांना खाली नमूद दिव्यांग प्रकारा नुसार "(अ)", "(ब)" आणि "(क)" या दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १ % तसेच "(ड)" व "(इ)" या दोन प्रकारांसाठी एकत्रित १ % या प्रमाणे एकूण ४ % आरक्षण देण्यात यावे.

अ) अंध / अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षाघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism) / मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability) / मानसिक आजार (Mental Illness)

इ) वरील दिव्यांग प्रकार (अ) ते (ड) मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर.

१.३ ज्या गट/संवर्गात (Group) /(Cadre) सरळ सेवेने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५% पेक्षा जास्त नसेल, अशाच गट/संवर्गामध्ये दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण राहील.

१.४ पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे विहित दिव्यांगत्व असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० % किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. पदोन्नती प्रक्रियेदरम्यान दिव्यांग उमेदवाराचे दिव्यांगत्व संशयास्पद वाटल्यास त्याच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहतील.

२) **पदोन्नतीमध्ये दिव्यांग आरक्षणातून सूट देणे -**

एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम - २०१६ च्या कलम २० (१) मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या शासकीय विभागास वा आस्थापनेस अथवा संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुनिश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह व दिव्यांग आयुक्त यांच्या शिफारशींसह संबंधीत प्रशासकीय विभागाने दिव्यांग कल्याण विभाग यांच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करावेत. तसेच यापूर्वी अपवाद करण्यात आलेल्या संवर्गासाठी /पदांसाठी पुनःश्च मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

३) **दिव्यांगत्वामुळे पदोन्नतीस नकार न देणे --**

३.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २० (३) अनुसार दिव्यांगत्वामुळे कोणत्याही व्यक्तीला पदोन्नती नाकारता येणार नाही.

३.२ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ मधील कलम २० (४) अनुसार दिव्यांग उमेदवार कोणत्याही पदावर काम करण्यास असमर्थ असल्यास त्याचे पद समान वेतनश्रेणी आणि सेवा फायदे असणाऱ्या इतर पदामध्ये रूपांतरीत करावे. त्याच्यासाठी सुयोग्य पद उपलब्ध होईपर्यंत अशा उमेदवाराला अधिसंख्य पदावर (supernumerary post) ठेवण्यात यावे. अधिसंख्य पदावर ठेवलेला दिव्यांग उमेदवार त्यानंतरच्या वरिष्ठ वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीसाठी पात्र असल्यास आणि असा उमेदवार संबंधित वरिष्ठ वेतनश्रेणीतील कोणत्याही पदावर काम करण्यास असमर्थ असल्यास त्याचे पूर्वीच्या वेतनश्रेणीतील अधिसंख्य पद व्यपगत करावे आणि वरिष्ठ वेतनश्रेणीतील अधिसंख्य पद तयार करून त्याला त्यावर ठेवावे. अशा प्रस्तावाबाबत प्रशासकीय विभागाने दिव्यांग कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभाग यांच्या मान्यतेने निर्णय घ्यावा.

३.३ एखाद्या अधिकारी / कर्मचाऱ्यास सेवेत नियुक्ती झाल्यानंतर दिव्यांगत्व आल्यास, त्याला पदावनत करता येणार नाही. दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची दिव्यांगांमधील सेवा ज्येष्ठता विहित दिव्यांगत्वाच्या वैध प्रमाणपत्राच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात यावी. एखाद्या अधिकारी / कर्मचाऱ्याचे नियुक्तीपूर्वीच्या दिनांकाचे दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र असल्यास, त्याची दिव्यांगांमधील सेवाज्येष्ठता नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात यावी.

३.४ एखाद्या दिव्यांग उमेदवाराची गुणवत्तेनुसार, दिव्यांग आरक्षणाचा लाभ न घेता निवड झाली असल्यास व अशा उमेदवाराचे नियुक्तीपूर्वीच्या दिनांकाचे दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र असल्यास, अशा उमेदवाराची दिव्यांगांमधील सेवा ज्येष्ठता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात यावी.

३.५ दिव्यांगांना सर्व गटांमध्ये पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात आल्यामुळे काही उमेदवारांनी आता विहित दिव्यांगत्व प्रमाणपत्र संबंधित यंत्रणेकडून उपलब्ध करून घेतले अथवा नियुक्ती प्राधिकारी यांना सादर केली असण्याची शक्यता आहे. अशा उमेदवारांची देखील दिव्यांगांमधील सेवा ज्येष्ठता त्यांच्या दिव्यांगत्वाच्या वैध प्रमाणपत्राच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात यावी.

३.६ कोणत्याही दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना तात्पुरत्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या आधारे पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा लाभ देण्यात येवू नये.

४) विहित दिव्यांगत्व असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करताना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात एका निवडसूची (भरती) वर्षातील रिक्त पदांवर गणना करण्यात यावी.

४.१ एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच राहील. कमी दिव्यांग प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

४.२ एखाद्या पदोन्नतीच्या पदासाठी एकापेक्षा जास्त निम्न संवर्ग उपलब्ध असल्यास, सर्व निम्न संवर्गातील दिव्यांग कर्मचाऱ्यांची त्यांच्या नियमित ज्येष्ठतेनुसार यादी तयार करणे आवश्यक आहे. सदर यादीतून विहित दिव्यांग प्रकारानुसार पदोन्नती करणे आवश्यक आहे.

**५) विचारक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना अनारक्षित पदावर पदोन्नतीने समायोजित करणे** -

५.१ **सेवाज्येष्ठतेने पदोन्नती** (Promotions by seniority cum fitness) - एखाद्या दिव्यांग अधिकारी / कर्मचारी सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या नियमित विचारक्षेत्रात येत असल्यास, त्यांचेसाठी दिव्यांगाच्या सुनिश्चित प्रकारानुसार दिव्यांग पद आरक्षित नसले तरी त्यांना पदोन्नती नाकारता येणार नाही.

५.२ एखादा दिव्यांग अधिकारी / कर्मचारी सेवाज्येष्ठतेनुसार (By seniority) पदोन्नत होत असल्यास व निवडसूचीमध्ये दिव्यांगासाठीचे सुनिश्चित पद रिक्त असल्यास असे पद दिव्यांग आरक्षणाने भरले असे समजण्यात यावे.

५.३ **निवडीने पदोन्नती** (Promotion by Selection) -

दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवाराची गणना दिव्यांगांसाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगांसाठी आरक्षित पद / पदे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

६) उमेदवार दिव्यांग आरक्षणाने पदोन्नत झाल्यास त्याच्या दिव्यांगत्व प्रकाराचा स्पष्ट उल्लेख पदोन्नतीच्या आदेशामध्ये करण्यात यावा.

**(७) मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा / विभागीय परीक्षा मधून पदोन्नती देताना, पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सूट देणे** -

मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा / विभागीय परीक्षा मधून पदोन्नती देताना, दिव्यांगाच्या आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये सूट देण्यात यावी. तथापि, विहित दिव्यांगत्वाच्या प्रमाणात (दिव्यांग प्रमाणपत्राचे निकष) कोणतीही सूट देता येणार नाही. सूट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ अराखीव व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

८) **बिंदूनामावली (रोस्टर) राखणे** :- पदोन्नतीमध्ये ४ % आरक्षण देण्यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील नियुक्तीसाठी योग्य ठरविलेल्या पदांची (Identified Posts) संवर्गनिहाय /गट निहाय / पद निहाय रिक्त पदांवर आधारीत (vacancy base) १०० पदांची सरळसेवा व

पदोन्नतीसाठी बिंदूनामावली /स्वतंत्र नोंदवही ठेवावी.त्यामध्ये १, २६, ५१ व ७६ हे बिंदू दिव्यांगांकरिता सुनिश्चित करण्यात यावेत. सदर बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| गट १ | बिंदू क्रमांक | १ ते २५ |
| गट २ | बिंदू क्रमांक | २६ ते ५० |
| गट ३ | बिंदू क्रमांक | ५१ ते ७५ |
| गट ४ | बिंदू क्रमांक | ७६ ते १०० |

उक्त गटांमध्ये "अ", "ब", "क" या विहित दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १ बिंदू आणि "ड" आणि "इ" या दिव्यांग प्रकारांसाठी एकत्रितपणे १ बिंदू असे दिव्यांग प्रकारानुसार बिंदू आरक्षित करण्यात यावेत.

८.१ सद्य:स्थितीत पदोन्नतीमध्ये मागासवर्ग आरक्षणाबाबतचे प्रकरणी विशेष अनुज्ञा याचिका क्र. सिव्हील अपील क्र. ६५८/२०२२ (SLP ( c ) No.२८३०६/२०१७) The State of Maharashtra Vs Shri Vijay Ghogre & ors. मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे दिव्यांग व्यक्तीस रिक्त पदांपैकी दिव्यांग प्रकारानुसार उपलब्ध बिंदूवर दर्शविण्यात यावे.

८.२ एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरूवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) /कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी .

८.३ जरी बिंदू क्रमांक १, २६, ५१ व ७६ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांनी घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव सुयोग्य दिव्यांग प्रकारातील उमेदवाराचा समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदूंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून चक्र गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना "प्रपत्र अ" सोबत देण्यात आला आहे.

८.४ दिव्यांग आरक्षण हे एकूण समांतर आरक्षण आहे. त्यामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांस त्यांच्या दिव्यांग प्रवर्गानुसार, त्यांना नोंदवहीत आरक्षित केलेल्या बिंदूनुसार पदोन्नती देताना त्यास त्याच्या सामाजिक आरक्षण/अराखीव प्रवर्गानुसार (उदा. अ.जा., अ.ज., अराखीव) बिंदूनामावली (Roster) मध्ये दर्शविण्यात यावे.

९) **मागणीपत्र सादर करताना निवड प्राधिकरणास / विभागीय पदोन्नती समितीला सादर करावयाचे प्रमाणपत्र** - दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या "प्रपत्र-ब" मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने

प्रमाणीत करावे. मागणीपत्रात / विभागीय पदोन्नती समितीच्या प्रस्तावात भरावयाच्या दिव्यांग प्रकाराचा स्पष्ट उल्लेख असावा.

**१०) दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे**

१०.१) निवडीने पदोन्नती (Promotion by Selection)

१) दिव्यांग आरक्षणाने पद भरती करताना सुयोग्य दिव्यांग कर्मचाऱ्यांचा दिव्यांग आरक्षणानुसार पदोन्नतीसाठी विचार करावा.

२) संबंधित दिव्यांग प्रवर्गानुसार पुरेसे दिव्यांग कर्मचारी सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रात उपलब्ध होत नसतील, तेथे सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्र ५ पट वाढवावे.

३) पदोन्नती क्षेत्र वाढवून देखील पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती जागा रिक्त ठेवावी आणि पुढील भरती वर्षात ओढावी.

४) पुढील भरती वर्षात देखील पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी.

५) अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने देखील पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे आणि हे आरक्षण पुढील दोन भरती वर्षाकरिता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे.

१०.२) ज्येष्ठतेने पदोन्नती (Promotions by seniority cum fitness)

१) दिव्यांग आरक्षणाने पद भरती करताना सुयोग्य दिव्यांग कर्मचाऱ्यांचा दिव्यांग आरक्षणानुसार पदोन्नतीसाठी विचार करावा.

२) संबंधित दिव्यांग प्रवर्गानुसार पुरेसे दिव्यांग कर्मचारी सर्वसाधारण पदोन्नती क्षेत्रात उपलब्ध होत नसतील, तेथे संबंधित ज्येष्ठता सूचीतून पात्र दिव्यांग उमेदवार मिळेपर्यंत खाली जावे.

३) ज्येष्ठता सूचीमध्ये पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती जागा रिक्त ठेवावी आणि पुढील भरती वर्षात ओढावी.

४) पुढील भरती वर्षात देखील पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी.

५) अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने देखील पद भरणे शक्य न झाल्यास तर हे आरक्षण पुढील दोन भरती वर्षाकरिता पुढे ओढावे व नंतर व्यपगत करावे.

१०.३) मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात.

११) ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदांच्या निम्न श्रेणीत, त्या दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती उपलब्ध असली पाहिजे.

१२) दिव्यांग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी केलेले पदोन्नती संबंधातील नियम, आदेश व निकष (उदा.पदोन्नतीलगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा, गोपनीय अहवाल इ.) दिव्यांग कर्मचाऱ्याने पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३) संपर्क अधिकारी (Liaison Officer) नेमणे -

प्रत्येक शासकीय आस्थापनेने किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करावी. सामाजिक आरक्षणाची प्रकरणे हाताळणाऱ्या मागासवर्ग कक्षातील अधिकारी यांचेकडून दिव्यांगांच्या पदोन्नतीबाबतच्या प्रकरणांची तपासणी करण्यात यावी.

१४) दिव्यांग आरक्षणाची रिक्त पद/अनुशेष याबाबतचा तपशील सूचना फलकावर लावणे -

संदर्भ क्र. ५ येथील दि.५.०७.२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार सरळसेवा भरती/आरक्षण/ अनुशेष ही माहिती सूचनाफलकावर लावताना, त्यात दिव्यांगांच्या सरळसेवा/पदोन्नती साठी उपलब्ध पदांबाबत व अनुशेषाबाबतचा तपशील समाविष्ट करण्यात यावा.

१५) तक्रार निवारण अधिकारी नेमणे -

प्रत्येक शासकीय आस्थापनेने विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना "तक्रार निवारण अधिकारी" म्हणून नेमण्यात यावे. सदर अधिकाऱ्याने दिव्यांगांच्या तक्रारीची नोंदणी झाल्यापासून २ महिन्यात तिचे निराकरण करावे.

१६) हे आदेश राज्य शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, सर्व शासकीय मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका, शासन अनुदानित संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यांना लागू राहतील.

१७) सदर आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०४२०१९१३३०६४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK MAHADEO CHEMTE

(अ. म. चेमटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई- ४०० ०३५.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव,मुंबई ४०० ०३२.
६. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य.
७. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद/विधानसभा) विधानभवन, मुंबई
११. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
१२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.

१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य.
१८. मा. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१९. मा.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२०. मा. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
२१. मा.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
२२. मा.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
२३. शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय (मूळ शाखा/अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२४. शासकीय अभियोक्ता, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२५. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२६. सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य.
२७. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
२८. निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/का.१६-अ, दि.२० एप्रिल, २०२३ सोबतचे सहपत्र

प्रपत्र अ

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम-२०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगांच्या पदोन्नतीची माहिती ठेवण्यासाठी

बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | चक्र क्रमांक (१ ते १०० रिक्त पदे) | बिंदू क्रमांक | दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित पद | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क (ड व इ) मधील दिव्यांग प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

भरती वर्षनिहाय गोषवारा -दि.१ सप्टेंबर, ते दि. ३१ ऑगस्ट, अखेर पर्यंत

| अ.क्र. | दिव्यांग आरक्षणासाठी उपलब्ध पदे | पदभरती वर्षात दिव्यांगातून भरण्यात आलेली पदे | पुढे ओढण्यात आलेली पदे | पदभरती वर्षात व्यपगत झालेली पदे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/का.१६-अ, दि. २० एप्रिल, २०२३ सोबतचे सहपत्र

## प्रपत्र -ब

## मागणीपत्र सादर करताना निवड प्राधिकरणास / विभागीय पदोन्नती समितीला सादर करावयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे .त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक --- वरील चक्र क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील ------ इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे .

सक्षम नियुक्ती प्राधिकारी